# गोमंतकीय लोकसाहित्याचे स्वरूप आणि सद्यस्थिती

- डॉ. बाळकृष्णजी कानोळकर

गोमंतकीय लोकसाहित्याचे स्वरूप आणि सद्यस्थिती समजून घेण्यापूर्वी गोमंतकाचा भूगोल आणि ऐतिहासिक परिप्रेक्ष समजून घेणे अत्यावश्यक ठरते. तसेच गोमंतकीय लोकसाहित्य असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा या शब्दप्रयोगातून ध्वनित होणारा अर्थ संदिग्ध स्वरूपाचा आहे याकडे अभ्यासकांचे लक्ष वेधावेसे वाटते. 'गोमंतकीय लोकसाहित्य' या संज्ञेतर्गत 'गोव्याचे' व 'गोव्यातील' म्हणजेच 'of Goa' आणि 'From Goa' असे दोन प्रकारचे लोकसाहित्य अंतर्भूत असलेले पहावयास मिळते. यापैकी आजचे "From Goa' हे उद्याचे 'of Goa' होणारे असते. काळाच्या प्रवाहात त्याला गोमंतकीयपण प्राप्त झालेले असते परंतु हे म्हणणेही शंभर टक्के खरे म्हणता येणार नाही. कारण यापैकी काही साहित्य हे काळप्रवाहात देखील आपले वेगळे अस्तित्व आपली वेगळी अस्मिता सतत जपत आलेले असते. तसे कोणत्याही भूप्रदेशाला त्याची म्हणून प्राप्त झालेली 'संस्कृति' ही त्या भूप्रदेशाची नसतेच तर ती त्या भूप्रदेशाच्या वसाहतीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी झालेल्या मानव समूहांची संमिश्र संस्कृति असते.कालांतराने ती बऱ्याच प्रमाणात एकजीव पावलेली असते आणि म्हणून कोणत्याही प्रदेशाची संस्कृति ही वरवर दिसते त्या प्रमाणात एक-संघ नसतेच, असे मला वाटते. परंतु विविध कालखंडात, विविध परिस्थितीत तिथे आलेल्या विविध संस्कृतींना कालांतराने आपल्या पर्यावरणात एक विशिष्ट आकार, एक विशिष्ट रंगरूप घेण्यास भाग पाडलेले असते. आणि या प्रक्रियेतूनच एका नव्या संस्कृतीचा-त्या प्रदेशाच्या संस्कृतीचा जन्म होत असतो. आजची गोमंतकीय संस्कृती, तिथली लोकसंस्कृतीही या विचाराला अपवाद असू शकत नाही.

गोमंतकीय लोकसाहित्य म्हणजे 'गोमंतकीय लोकांनी' निर्मिलेले साहित्य असे आपणास अभिप्रेत आहे. परंतु हा 'गोमंतकीय लोक' म्हणजे कोण? आजची गोमंतकाची लोकसंख्या सुमारे पंधरा लाख इतकी आहे आणि गोमंतकीय लोकसंस्कृतीची ज्ञात ओळख सुमारे एक हजार वर्षे, सर्वसाधारणपणे, मानता येईल. गोवा हा कोंकण प्रदेशाचा एक भाग आहे. जी कोंकणची संस्कृती तीच गोव्याची असे सर्वसाधारणपणे मानले, तरीही गेल्या पाचशे वर्षापासून त्यातही इतिहासाने फेरफार घडवून आणलेले आहेत, हे विसरून चालणार नाही. या हजारो वर्षांत आणि तदपूर्वापार कालखंडात जेव्हापासून या प्रदेशाचे वसाहतीकरणास प्रारंभ झाला तेव्हापासून ते आजतागायत अनेकविध लोकसमूह इतिहासाच्या विविध कालखंडात इथे येऊन वसलेले आहेत. त्यानी आपल्या बरोबर आपली संस्कृती आणलेलीच असेल. तेव्हा मूंड, गोंड, कीरात, द्रविड, मूर, आर्य तुर्क लाटीन इ. सर्वच मानवसमूहांच्या संस्कृतीच्या कमी अधिक अभिसरणातून आजची गोमंतकीय संस्कृती आणि म्हणून लोकसंस्कृती देखील आकारास आलेली आहे हे त्रिकालाबाधित सत्य आहे.

पुन्हा सर्वच जनसमूहांना 'लोक' ही संज्ञा पूर्णार्थाने लागू पडत नाही. आधुनिक विज्ञान आणि तंत्र ज्ञानाच्या प्रभावापासून शक्यतो दूर राहून परंपरानिष्ठ जीवन जगणारा जनसमूह म्हणजे 'लोक' असे अभ्यासाच्या दृष्टीकोनातून गृहित धरणे योग्य होईल. या लोकांची संस्कृती ती लोकसंस्कृती. या लोकांचे साहित्य ते लोकसाहित्य, पुन्हा लोकसाहित्य म्हणजे केवळ मौखिक आविष्करण एवढेच मर्यादित मानणे वस्तु स्थितीला नाकारण्यासारखे होईल. वस्तुगत तसेच वस्तुगत नसलेले, मूर्त तसेच अमूर्त असे सारेच साहित्य यात समाविष्ठ केले गेले पाहिजे. सर्वसाधारण आज तसा विचार 'लोकसाहित्याचा' अभ्यास करणारे अभ्यासक करताना आढळून येत नाहीत. तेव्हा या साहित्याची सम्यक व्याख्या करावयाची झाल्यास असे म्हणता येईल की, लोकांचे, लोकांमधून, लोकांकरितां निर्माण केलेले साहित्य ते लोकसाहित्य.

वरील विवेचनाचा सारांश घ्यायचा झाल्यास असे दिसून येईल की कोणत्याही भूप्रदेशातील 'लोक'ची जडण घडण ही अहर्निश चालणारी, अखंडित अशी प्रक्रिया असते. गोमंतभूमी ही याला अपवाद नाही. हजारो वर्षांपूर्वी कधीतरी जेव्हा ही प्रक्रिया त्या भूमीत सुरू झाली तेव्हा तिथे असलेल्या 'लोकां'ची संख्या आणि आजच्या 'लोकां'ची संख्या यात महदंतर आहे. या सर्व 'लोकां'च्या लोकसंस्कृतीच्या संयोगातून आजची गोमंतकीय लोकसंस्कृती आणि पर्यायाने लोकसाहित्य सिद्ध झालेले आहे.इतिहासांच्या बिकट-दूरत्त्वामुळे ते शेजारच्या प्रदेशासारखेच आहे असे जरी भासत असले तरी ते त्याचे फसवे स्वरूप आहे हे लक्षात घेतले पाहिजे. तसे झाले तर तद्विषयक अपसमजूतींना वाव मिळणार नाही आणि त्याच्या अभ्यासाला योग्य ती चालनाही मिळण्यास मदत होईल. उदाहरणार्थ-नजिकच्या इतिहासकाळात गोव्याचा उत्तरेकडील भूभाग हा महाराष्ट्र आणि मराठी संस्कृतीच्या जेवढा जळव होता तेवढा मध्य गोवा व दक्षिण गोवा नव्हता. उलट गोव्यात पोर्तुगीजांचा भिन्न संस्कृतीचा अंमल तर दक्षिण गोव्यात कानडी सौंद्रेकरांची सत्ता होती, परिणाम स्वरूप गोमंतकीय लोकसंस्कृतीला त्रिविध स्वरूप प्राप्त झाले.

गोमंतकीय लोकसंस्कृतीचा सम्यक अभ्यास करून त्याचे स्वरूप निश्चित करावयाचे झाल्यास विविध कालखंडातील गोमंतकाचा विचार करावा लागेल. त्यासाठी सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे कालखंड कल्पिता येऊ शकतात.

- इ.स. पूर्व १०००
- इ.स. १००० ते १२००
- इ.स.१२०० ते १३००
- इ.स. १३०० ते १५००
- इ.स.१५०० ते १९००
- इ.स.१९०० ते १९६०
- इ.स. १९६१ ते १९९०
- इ.स. १९९० ते पुढे

या व्यतिरिक्त ऐतिहासिक काल आणि प्रागैतिहासिक काल असेही दोन कालखंड ढोबळमानाने करता येणे शक्य आहे. उसगाळीमळ, काजूर येथे सापडलेली प्रस्तरशिल्पे आपल्याला हा विचार करावयास भाग पडतात. या प्रस्तर शिल्पांपैकी एक तर स्पष्टपणे 'लज्जागौरी' चे आहे. (इ.स. पूर्व ८०००) गोमंतकीय लोकसाहित्याकडे वळण्यापूर्वी 'गोमंतकातील लोकसाहित्याविषयी काही विवेचन करावयाचे आहे. आणि अपेक्षा आहे की ते इथे अनाठायी होणार नाही. आज गोमंतकीय लोकसाहित्यांतर्गत ज्या साहित्याचा विचार केला जातो त्त्यात लोककथा, लोकगीत, लोककथागीत, लोकोक्ति, लोकनाट्य यांचा समावेश होतोच परंतु त्यापेक्षाही अधिक लोककलांचा, त्यातही लोकनृत्याचा भरणा अधिक आहे. इतकेच नव्हे तर गोव्याबाहेरील लोकांना गोमंतकीय लोकसाहित्य म्हटल्यावर पहिल्या प्रथम आठवते ती 'देखणी' आणि 'मांडो'. या दोन्हींनाही गोमंतकीय लोकसाहित्य म्हणणे धाडसाचे ठरावे. यापैकी 'मांडो' तर नृत्य नसून गीत आहे आणि खिस्ती उच्चवर्णीयात प्रचलित आहे. अलिकडे प्रतिष्ठीत पणाच्या दिशेने प्रवास करणारे इतर खिस्ती बांधव त्याकडे आकृष्ट झालेले पहावयास मिळतात. 'देखणी' बद्दलही बरेच काही सांगण्यासारखे आहे. उच्चभ्रू खिस्ती समाजात मूळात उगवलेला हा नृत्य प्रकार असून तो तसा सर्वसामान्य जनतेत 'लोकां'चा नाही. गोमंतकीय लोकसाहित्याचे अभ्यासक श्री विनायक खेडेकर याला 'लौकिक' साहित्य असे संबोधतात. आणि मला वाटते तेच जास्त सयुक्तिक आहे. 'बोंदेरा' हा उत्सव, 'भोसल्यांचे फेस्त' हा समारंभ असे आणखीही काही प्रकार दाखविता येतील की ते लोक साहित्यात सामाविष्ठ होऊ शकत नाहीत, वाटल्यास त्यांना 'लौकिक साहित्य' म्हणता येईल. 'गोमंतकीय' व 'गोमंतकातील' यामधील विभाजक रेषा अशी 'तत्त्वांच्या कसोटीवर' सिध्द करावी लागेल. अस्तु.

लोकजीवनाला सर्वांगाने आविष्कृत करणारे जे जे ते ते सारेच लोकसाहित्य. देशी विदेशी अनेक मान्यवर अभ्यासकांनी लोकसाहित्याची वर्गीकरणे केलेली आहेत. ती सर्वच्या सर्वच तुटपुंजी आहेत असे अभ्यासाअंती मी ठामपणे सांगू इच्छितो. वर्गीकरण ही अभ्यासाकरीता एक सोय असते हे मान्य करूनही ती पुरेशी व्यापक आणि सूक्ष्म नाहीत हे इथे नमूद करावेच लागेल. सर्वसामान्यपणे सहजपणे ज्ञात असलेल्या पुढील विभागातून गोमंतकीय लोकसाहित्याच्या स्वरूपाचा सर्वसामान्य परिचय येथे करून देत आहे, तो असा :-

**१. मौखिक आविष्कार :**

मौखिक आविष्कार हा भाषिक आविष्कार असतो. सर्वच प्रदेशांतील लोकसाहित्याचे तो अविभाज्य अंग असतो. आणि सर्वसाधारणपणे त्यात गीत, कथागीत, कथा, लोकवस्ती, नाट्य यांचा अंतर्भाव होत असतो. गोमंतकीय लोकसाहित्यही याला अपवाद नाही. परंतु गोमंतकीय लोकसाहित्याच्या या अंगाचा विशेष परिचय करून घ्यायचा असेल तर गुडुल्यागीत, लोकरामायण, लोकमहाभारत, बळीराजाची कथा, चिल्लया बाळाची कथा ही विलपिका, शिमग्यात गाइल्या जाणाऱ्या जती सोकारती, चंदन, चौरंग, धालो गीते इत्यादी कथागीत प्रकार पहावे लागतील. गीतांमध्ये जात्यावरची गाणी (होवयो), लग्नगीते, अल्लयो (अंगाई गीत) यांचा अनुभव घ्यावा लागेल. लोकथांमधले 'काणी काणी कोवारा', कुंडेकुस्कुट, पातोळ्यांचे झाड, पडवळाची गोष्ट, कुर्ली कन्या इत्यादी कथा पहाता येतील. लोकनाट्याच्या बाबतीत गोमंतकीय लोकसाहित्य अत्यंत समृध्द आहे. पेरणी जागर, खिस्ती जागर, शिवोलीचा जागर, गावड्यां जागर, कोळी जागर, गौळण काला, संकासूर काला, दशावतार काला, बाळ क्रीडा काला, रणमाले, खेळ, तियात्रु, खेळ तियात्रु, दशावतार, गोंधळ इत्यादी नाट्यप्रकार पहावयास मिळतात. इथली लोकवस्ती पर्यावरण संपृक्त असून त्यातून गोमंतकीय जन-जीवनाची व जमीन वनाची कल्पना ऐकवणाऱ्याला येऊ शकते. गोमंतकीय लोकवाङ्मयाची भाषा ही खास गोमंतकीय भाषा आहे.

**२. भौतिक आविष्कार :**

अन्न, वस्त्र व निवारा या भौतिक आविष्काराशी प्रामुख्याने संबंधित असलेल्या बाबी त्या मधून इथल्या विभिन्न आविष्करणाव्रर चांगला प्रकाश पडतो. इथले वैशिष्ट्यपूर्ण स्थापत्य इतर प्रदेशापेक्षा निश्चितपणे वेगळे आहे. त्यातून उत्तर व दक्षिण हिंदुस्थानी, तुर्की तसेच लॅटीन व गोथिक स्थापत्याचा कमी अधिक संगम पहावयास मिळतो. आणि त्याने गोमंतकीय संगीताला त्याचे असे एक वेगळेपण बहाल केलेले आहे. घुमट, म्हार्दोळ व समेळ ही खास गोमंतकीय वाद्ये आहेत. सान्ना, रोट आणि धोदेल हे खास गोमंतकीय पक्वान .

**३. विधि-विधाने, कर्मकांड इ :**

लोकजीवनाच्या या अंगामध्येही गोमंतकीय 'लोक' वेगळेपणा जपणारा आहे. प्रसाद पाकळी, घाडी, भगत, गुरव इत्यादी त्याची व्यवच्छेदक लक्षणे आहेत. नवस, गाऱ्हाणे याचाही इथे उल्लेख करता येण्यासारखा आहे. बनवड, नवें, सुता पुनव, दाळप इ. प्रकार पृथक आहेत.

**४.सण, उत्सव व समारंभ :**

गोमंतकातील गणेशोत्सव, दिपावली व शिमगोत्सव महाराष्ट्र व इतर भारतीय प्रदेशाच्या तुलनेत वैशिष्ट्यपूर्ण आहेत. दिपावलीत इथे नरकासूर दहन केले जाते. भारतातले हे एकमेव उदाहरण आहे. तिथला शिमगा बहुविध आहे. धाकटा शिमगा, थोरला श्मिगा, रंगपंचमी, इत्रुज अशा विविध स्वरूपात तिथे शिमगा साजरा केला जातो. तिथले जत्रोत्सव देखील विविधांगी आणि वैशिष्ट्याने नटलेले आहेत त्यात धोंडांची जत्रा, होमखण जत्रा, माल्याची जत्रा, गड्याची जत्रा यांचा समावेश होतो. गुडुल्या वा गोडवा परब आणि कोडवा परब हे वैशिष्ट्यपूर्ण सण इथल्या गावडा, कुणबी व वेळीप समाजात साजरे केले जातात. मोरजाईचा कळसोत्सव, फातर्फेची जत्रा, मिलाग्रीचे फेस्त, गोंयच्या सायबाचे फेस्त, टका वा टक्या जात्रा, शेणाचे गोकूळ, शिशारान्नी, धालो, धेणलो, कातयोत्सव, चोरोत्सव, दिवजोत्सव, करवल्या, संजाव इत्यादींची पृथकत्त्वाच्या दृष्टीकोनातून नोंद घ्यावीच लागेल. दसरोत्सव, तरंगोत्सव आणि हरतुळ असे सण-उत्सवही लक्षवेधक आहेत.

**५. लोककला :**

नृत्य, शिल्प, चित्र, संगीत, नाट्य इ. मुसळ नृत्ये, खिस्ती गावड्यांचा दांडला खेळ, घोडेमोडणी, वीरभद्र, मोरूले, हाणपेट, तालगडी, तोणयामेळ इ. नृत्यप्रकार वैविध्यपूर्ण आणि पृथक म्हणावे लागतील. शिल्प, संगीत व नाट्याविषयी वर आलेलेच आहे. चित्राच्या बाबतीत सांगायचे झाले तर 'कावी कला' ही फ्रेस्कोच्या जातकुळीतली वेगळी चित्रशैली पूर्वी मंदिरातून पहावयास मिळायची.

**६. देवदेवता :**

देवदेवताच्या बाबतीतही गोमंतकाचे वेगळेपण लक्षात भरते. वारूळ रूपातली सातेर, रवळनाथ ही इथली प्रमुख दैवते. किंबहुना इथली उपासना पद्धती

सातेरी - रवळनाथ पंथीय (Sateri - Ravalnath Cult) प्रथमतः मूलतः आहे, असे म्हटले तर ते अयोग्य ठरू नये. शांतादुर्गा, बाराजण, दाड, मिलाग्रीज, पारे, बिरोबा, वेताळ वा , वाघरो, रौदरो, खाप्री, भूमिका, शिम्रो देव, भूतखांब, खुटी, दखण, मल्लिकार्जुन, देवकी-कृष्ण, लईराई, सप्तकोटेश्वर, चंद्रेश्वर, जागरयो, ब्रह्मदेव, नारायणदेव, अनु, मंडोदरी चौरंगीनाथ, सिध्दा इत्यादी देवतांचा विशेष अभ्यास करण्यासारखा आहे. त्याद्वारेही गोमंतकीय लोक संस्कृती नि साहित्यावर वेगळा प्रकाश पडू शकतो. कानडी वंस, मसणदेवी, पाइकदेव, हेमाडदेव इत्यादी आणखी काही वैशिष्ट्यपूर्ण देवता.

**७.इतर :**

लोकवैद्यक, लोकक्रीडा, लोकभ्रम, लोकश्रध्दा या विषयां अंतर्गत देखील-गोमंतकीय लोकसाहित्याची पृथमात्मता दाखवून देणे शक्य आहे. चिखलकाल्या सारखा क्रीडा प्रकार इथे अस्तित्वात आहे. तर दुरींग व होळीचा नारळ तोडणे सारखे पूर्वापार चालत आलेले क्रीडा प्रकार इथल्या शिमगोत्सवातून आढळून येतात. 'रतीब' हा तिथल्या मुसलमान बांधवाकडून केला जाणारा विधी, तसेच ख्रिस्ती बांधवांचा 'कार्निवल' व 'नोयान्न' हा विधी याची ही विशेष नोंद घेण्यासारखी आहे.

एकुणच गोमंतकीय संस्कृती ही बहुरंगी, बहुढंगी आणि म्हणूनच बहुरूपिणी आहे. करिता त्यातून उद्‌गम व विकास पावलेले तिथले लोकसाहित्य याला अपवाद कसे असू शकते ? याचा परिणाम इथला शिमगोत्सव, धालोत्सव, कालयोत्सव इ. उत्सवांवर मोठ्या प्रमाणात होत आहे. आज या उत्सवाना व लोककलांना क्रयवस्तूचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. त्यातच देखणी, मांडो, तियात्रु सारखे प्रकार आज गोमंतकीय लोकसाहित्याच्या केंद्रस्थळी येऊ पहात आहेत. (बाह्य जागेसाठी) किंबहुना तेच आज गोमंतकीय लोकसाहित्याची ओळख झालेले आहेत.

शिवाय गोमंतकाच्या मुक्तीनंतर (१९६१) आणि प्रामुख्याने १९९० नंतर गोव्यात मोठ्या प्रमाणात नोकरी, उद्योग व्यवसाया निमित्ताने येऊन स्थायिक झालेल्या विभिन्न समाज गटामुळे तिथल्या एकुणच संस्कृतीत भर घातलेली आहे. परिणाम स्वरूप सिरीयन चर्च, अयप्पा मंदिर, बालाजी मंदिर, मुरूगन मंदिर अशा नव्या मंदिरांची उभारणी तिथे झालेली आहे. त्याचप्रमाणे साईनाथ, गणेश मंदिरांच्या नि मशिदिंच्या निर्मितीत कमालीची वाढ झालेली आहे. दांडिया, दुर्गापूजन कव्वाली सामने अशा नव्या उत्सवांची भर त्यात पडलेली आहे.

सारूपात सांगायचे झाले तर गोमंतकाचे आज झपाट्याने शहरीकरण होत आहे. हा वेग इतका जबरदस्त आहे की येत्या दहा वीस वर्षात तिथे 'खेडे' नावाला सापडणार नाही. हाच तिथल्या लोकसंस्कृतीला आणि म्हणून लोकसाहित्याला सर्वात महत्त्वाचा धोका आहे. शिवाय ग्लोबलायझेशनच्या या काळात त्यांचे स्वरूप किती आणि कसे पालटून जाईल हा अभ्यासाचा आणखी एक विषय ठरू शकतो.

✦ ✦ ✦

## मातृभाषा

जगातील अर्ध्याहून जास्त म्हणजे ६ हजार ते ७००० भाषा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. आपल्या कुटुंब कबिल्याची किंवा जनसमूहाची बोली भाषा किंवा मातृभाषा म्हणून वापरल्या जाणाऱ्या या भाषा बोलणारे, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक व्यवहारांत वापरणारे लोक मोठ्या प्रमाणात कमी होताना आढळले आहे.

२१ फेब्रुवारी हा दिवस जागतिक 'मातृभाषा दिन' म्हणून पाळला जातो. परंपरेने चालत आलेल्या भाषा टिकाव्या, त्यांचे सांस्कृतिक दायित्त्व, मूल्य कायम राहावे म्हणून हा दिवस लोक जागृतीसाठी पाळण्यात येतो.

जनसंपर्क वाढविणे, देवघेव व सामंजस्य वाढविणे या हेतूने यूनेस्को संघटनेच्या सदस्य राष्ट्रांतून अशा प्रगत भाषांच्या जतनासाठी प्रयत्न केले जात आहेत. जागतिक वारसा जपण्यासाठी विविध भाषांचे ज्ञान होणे, विविध देशांचा सांस्कृतिक संगम व्हावा यासाठी अशा सांस्कृतिक कार्यक्रमांना वाव दिला जातो.

दीर्घ सांस्कृतिक वारसा, परंपरा व साहित्यिक परंपरा लाभलेल्या प्रमुख भाषांचा जनसंपर्क माध्यमातील वापर हे आव्हान बनत चालले आहे.

✦ ✦ ✦